# महाराष्ट्राच्या राजकारणाची स्थितिगती

महाराष्ट्रातील राजकारणाची सध्याची स्थितिगती दोन प्रकारच्या विधानांनी निर्धारित होते आहे, आणि यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना हे तीन पक्ष गुंतलेले आहेत. या तीन पक्षांनी राज्यात सरकार स्थापन करायलाच हवं, हे यातलं पहिलं विधान. आणि, या पक्षांनी राज्यात सरकार स्थापन करावं, हे दुसरं विधान. पहिल्या विधानामध्ये 'च' आहे, त्यातून निकड अधोरेखित होते, तर 'करावं' हे क्रियापद वापरून थांबणारं दुसरं विधान इष्टतासूचक आहे. उपरोल्लेखित पक्ष या दोन विधानांमध्ये हेलकावत आहेत. तर, राजकीयदृष्ट्या अचूकता राखण्याची सवय असलेल्या 'राजकीय भोंदूं'नी विशेषतः काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासाठी काही ठोस सूचना केल्या आहेत– या पक्षांनी शिवसेनेसोबत सरकार स्थापन करू'च' नये, ही त्यांची सूचना आहे. अशा सूचनांमधील 'च'ची भाषा निवडणुकीय राजकारणाची विशिष्ट दिशा गृहित धरते आणि चर्चाविमर्शाला काहीच अवकाश सोडला जात नाही. राजकारणाचा 'शुद्ध' दृष्टिकोन राखणाऱ्या काही राजकीय भाष्यकारांच्या मते, नैतिकदृष्ट्या हे तीनही पक्ष सरकार स्थापन करण्यासाठी पुरेसे पात्र नाहीत. या दृष्टिकोनानुसार, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांची 'इहवादा'बाबतची (सेक्युलॅरिझम) निष्ठा संशयास्पद आहे. परंतु, अशा साशंकतेच्या वातावरणातही उपरोल्लेखित तीन पक्षांमधील चर्चामसलत सुरू आहे, आणि माध्यमांमधील बातम्यांनुसार, सरकारस्थापनेच्या दिशेने या पक्षांची वाटचाल सुरू आहे.

त्यांच्यातील चर्चा बरीचशी ढोबळ राहिली असली, तरी सरकारस्थापनेसंदर्भातील चर्चांना अजून या पक्षांनी पूर्णविराम दिलेला नाही. गेला काही काळ बंद दरवाज्याआड होत असलेल्या या चर्चांवरून सरकारस्थापनेची व्यावहारिक निकड या पक्षांच्या आता लक्षात आल्याचं दिसतं आहे. प्रत्येक पक्ष आपापले आस्थाविषय या चर्चांमध्ये मांडत असल्याचं सांगितलं जातं. विशेषतः काँग्रेस व राष्ट्रवादी यांनी सावध पावलं उचलून काही प्रमाणात 'स्पष्ट' स्वरूपाची संदिग्धता जाणीवपूर्वक राखल्याचं दिसतं. या 'सावधानते'मुळे चर्चा 'अशक्य' असल्याचा दृष्टिकोन टाळता आला असावा.

कट्टर हिंदुत्वाची भूमिका शिवसेनेने सौम्य करावी, अशी अपेक्षा काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याकडून चर्चांमध्ये उपस्थित केली जाणं स्वाभाविक आहे. बहुविधतावाद व सांप्रदायिक सौहार्द या मूल्यांबाबत काही तडजोड केली जाऊ नये, असं यातून ध्वनित होतं, पण अपवादात्मक परिस्थिती ही मूल्य खूण म्हणून वापरणं गरजेचं असतं असाही संकेत यातून दिला जातो आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या आस्थाविषयांमध्ये शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींच्या कचाट्यातून सोडवण्यासारखे मुद्दे प्रबळ होऊ लागले आहेत. त्यामुळे शिवसेनेला हिंदुत्वनिष्ठेसारखे मुद्दे सौम्य करणं शक्य होईल. इथे पुढील प्रश्न उपस्थित करणं गरजेचं आहे : शिवसेना प्रगतिशील दृष्टिकोनाने व निर्धाराने जबाबदार पावलं उचलेल, की रुढीवादी (कन्झर्वेटिव्ह) मानल्या जाणाऱ्या धर्मनिष्ठेकडेच जाईल?

गतकालीन प्रतिगामित्वावर दृढ श्रद्धा ठेवणं आणि उतरंडीवर आधारित सामाजिक व्यवस्थेची चिकित्सा करण्याबाबत पूर्ण मौन धारण करणं, यांमुळे सदर निष्ठेला रुढीवादी म्हटलं आहे. या संदर्भात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांबाबत एक प्रश्न उपस्थित करावा लागतो : जबाबदार निर्धार दाखवून त्याभोवती आपलं राजकारण संघटित करण्याची बांधिलकी हे दोन्ही पक्ष कायम ठेवतील का? या संदर्भात संबंधित पक्षांकडून स्पष्ट उत्तरांची अपेक्षा आपल्याला करता येणार नाही, सातत्याने होणाऱ्या चर्चांद्वारेच यातून काही मार्ग निघेल आणि हानिकारक निष्ठा दूर ठेवणं शक्य होईल.

राजकारणाच्या चर्चाविमर्शप्रधान अवकाशामध्ये जबाबदार निर्धार कायम ठेवून परिशीलन करणं आवश्यक असतं. अशा प्रकारच्या निर्धारामध्ये सर्वसाधारणतः सक्तीची भाषा वापरली जात नाही. चर्चेत सहभागी झालेल्या पक्षांच्या परस्पर लाभासाठी सत्तेचं वाटप करणं, या व्यावहारिक गरजेतून ही भाषा उद्भवते. नैतिकदृष्ट्या सजग चर्चाविमर्शांमध्ये जबाबदार निर्धाराचा समावेश असतोच. सर्वसामान्य लोकांना खरोखरच कशाची गरज आहे, याला अशा चर्चांमध्ये प्राधान्य असतं. हे प्राधान्य केवळ बोलण्यापुरतं असून चालत नाही, तर त्याला वास्तवात आधार असावा लागतो.

सक्तीविना निर्धार टिकून राहातो, असा याचा अर्थ नाही. राजकीय पक्षांना जबाबदार निर्धार दाखवणं भाग पडतं. समाजामध्ये शांतता व सांप्रदायिक सौहार्द आणि बहुधा मैत्री टिकून राहावी यासाठी असा निर्धार आवश्यक असतो, त्याचप्रमाणे विवंचनेत असलेल्यांना वाचवण्यासाठी वेगाने कृती करण्यासाठीही हा निर्धार गरजेचा ठरतो. महाराष्ट्रातील निवडणूक निकालांनंतर राजकीय अस्थिरता पसरली आहे, अशा वेळी जबाबदार निर्धारासाठीचा अवकाश निर्माण होतो. त्याचप्रमाणे नैतिक निर्धारासाठीच्या अवकाशालाही यातून चालना मिळू शकते. परिणामी, धार्मिक प्रतीकांद्वारे सांप्रदायिक संघटन करून जनतेची दिशाभूल करण्यापासून पक्षांना रोखणं शक्य होतं. सांप्रदायिक सौहार्दाबाबतची नैतिक बांधिलकी एकदा सिद्ध करून जबाबदार निर्धार थांबत नाही, तर काळजीपूर्वक सातत्याने चर्चाविमर्श करून, संवाद साधून हा निर्धार विकसित करावा लागतो. केवळ पक्ष कार्यकर्त्यांशी हा संवाद साधून पुरत नाही, तर सर्वसाधारण जनतेशी संवाद साधणं अधिक महत्त्वाचं ठरतं. ●

---

## अयोध्या निकालाचा अर्थ लावताना

*न्यायिक विशेषाधिकार व त्यातून मिळालेले आदेश संपूर्ण न्यायाची हमी देतात का?*

बाबरी मशिदीच्या जागेशी निगडित मालकी खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालातील स्फुट आशयाइतकंच महत्त्व अस्फुटालाही आहे. त्यामुळे निकालात शब्दांद्वारे काय म्हटलंय, एवढंच जाणून घेणं पुरेसं नाही, तर कोणत्या गोष्टी न्यायालयाने निकालात नमूद केलेल्या नाहीत, हेही समजून घ्यावं लागेल.

वादग्रस्त २.७७ एकर मालमत्तेची मालकी 'भगवान श्री राम विराजमान' व त्यांच्या राखणदारांना दिल्यानंतरही त्यासंबंधी आठ आदेश देण्याची गरज न्यायालयाला भासावी, हे कुतूहलजनक आहे. बाबरी मशीद उभी असलेल्या जमिनीवर मालकी हक्क सांगणाऱ्या अनेक हिंदू व मुस्लीम पक्षकारांमध्ये १९४९पासून हा खटला सुरू आहे. अशा वेळी ही मालमत्ता देवाच्या मालकीची आहे, याची न्यायालयाला खात्री पटली असेल, तर त्या जागेचं आता काय होतं याची चिंता न्यायालयाने का करावी, असा प्रश्न आपण उपस्थित करायला हवा.

संबंधित जागा १९९३ साली केंद्र सरकारने ताब्यात घेतली आणि विशिष्ट अटींवर एखाद्या विश्वस्तनिधीकडे किंवा प्राधिकरणाकडे ती हस्तांतरित करण्याचे अधिकार केंद्र सरकारला देणारा 'अयोध्येतील विशिष्ट प्रदेशावरील ताबा अधिनियम, १९९३' हा कायदा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर, अयोध्येतील या वादग्रस्त जागेबद्दलचा निकाल दिल्यावर कायद्यानुसार केंद्र सरकारने स्वतःच्या अधिकाराखाली पुढील उचित कार्यवाही करावी, असं म्हणून न्यायालयाला थांबता आलं असतं. पण निकालाच्या अंमलबजावणीचा स्पष्ट तपशील निर्धारित करण्याचा मार्ग न्यायालयाने स्वीकारला. असं करण्याची गरज न्यायालयाला का भासली आणि अखेरीस न्यायालयाच्या इच्छेनुसार केंद्र सरकार पावलं उचलेल का, असे प्रश्न यातून उपस्थित होतात.

न्यायालयाने या खटल्यातील निकालासंदर्भात दिलेले आदेश राज्यघटनेतील अनुच्छेद १४२शी सुसंगत आहेत. संबंधित पक्षकारांमध्ये संपूर्ण न्याय प्रस्थापित करणं आवश्यक असेल तेव्हा सरकारने अशा प्रकारे स्वतःच्या अधिकारात आदेश देणं अभिप्रेत आहे. त्यामुळे हे आदेश अचानकपणे उद्भवलेले नाहीत. न्यायालयाला असे आदेश देण्याचा अधिकार का गरजेचा आहे आणि राज्यघटनेत त्यासंबंधीची तरतूद का करण्यात आली, याचा काही प्रमाणात तपशिलातील आढावा न्यायालयाने सदर निकालामध्ये घेतला आहे. मानवी इतिहास व कृतिशीलतेची व्यामिश्रता लक्षात घेता प्रत्यक्षार्थवादी व वैधानिक कायद्यातील मौनावर मात करणं गरजेचं असतं, असं न्यायालयाने म्हटलं आहे.

या दृष्टीने पाहिलं, तर आपल्याला बहुधा असा समर्थनीय निष्कर्ष काढता येईल की, वादग्रस्त मालमत्तेवरील स्वतःचा कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्यात हिंदू पक्षकारांना यश आलं, पण मुस्लीम पक्षकारांनाही काही ना काही मार्गाने अनुकूल ठरेल असा हा निकाल आहे. थोडक्यात, निकालाची निष्पत्ती समतुल्य आहे, असा हा निष्कर्ष निघू शकतो. त्यामुळे 'अयोध्या अधिनियमा'खाली केंद्र सरकारने कोणतीही योजना तयार केली, तरी सुन्नी वक्फ मंडळाला देण्यात येणाऱ्या जमिनीवर मशीद उभारणं बंधनकारक ठेवण्यात आलं आहे.

तरीही, एक प्रश्न उरतोच : हा न्याय आहे का? हिंदूंची बाजू कायद्यानुसार सिद्ध झाली असेल, तर मानवी इतिहास व कृतिशीलतेच्या व्यामिश्रतेचा कोणता पैलू बघून न्यायालयाने सुन्नी वक्फ मंडळाला जमीन देण्याचे आदेश केंद्र व उत्तर प्रदेश सरकारांना दिले?

याचं उत्तर फारसं अवघड नाही. बाबरी मशिदीचा विध्वंस दोनदा झाल्याचं न्यायालयाने निःसंदिग्धपणे नमूद केलं आहे. पहिल्यांदा, १९४९ साली रात्रीच्या अंधारात मशिदीचा विध्वंस करून मध्यवर्ती घुमटाखाली रामाच्या मूर्ती ठेवण्यात आल्या. दुसऱ्यांदा, १९९२ साली कारसेवकांनी अनेक लोकांच्या समोर बाबरी मशिदीचा घुमट उद्ध्वस्त केला. परंतु, यांपैकी कोणत्याही घटनेमुळे न्यायालयाच्या लेखी संबंधित मालमत्तेवरील हिंदूंच्या दाव्याची वैधता डळमळीत झाली नाही. बाबरी मशिदीच्या मध्यवर्ती घुमटाखाली रामजन्मभूमी होती, या हिंदू श्रद्धेवर आणि विश्वासावर न्यायालयाने स्वतःचा तर्क बेतला, आणि १८५७नंतरही मशिदीचा वापर मशीद म्हणून होत होता या मुस्लिमांच्या दाव्याला मात्र ग्राह्य मानलं नाही.

तर, न्यायालयाने अस्फुट ठेवलेला आशय असा आहे : १९४९ व १९९२ या वर्षांमधील बेकायदेशीर कृत्यांमुळे हिंदू पक्षकारांची बाजू बळकट झाल्याचं आम्ही मान्य करतो, पण तरीही या कृत्यांचा लाभ त्यांना मिळेल अशी मुभा आम्ही देतो. १९४९ व १९९२ या वर्षांमधील बेकायदेशीर कृत्यांसंदर्भात मुस्लिमांना न्याय देणं आम्हाला शक्य नाही, त्यामुळे आता जे दिलं आहे त्यात मुस्लीम पक्षकार समाधानी होतील, असी आम्हाला आशा आहे.

न्यायालयाने निकालासोबत दिलेले आदेश केवळ

न्यायिक दयाभावाचा नमुना आहेत. पूर्ण न्याय द्यायचा असेल, तर केवळ मालकीहक्काचा प्रश्न मिटवून भागणार नाही, तर १९९२मध्ये घडलेल्या अन्याय्य घटनांवर अर्थपूर्ण मार्गाने उपाय करावा लागेल. या संदर्भातील न्यायालयाचा स्वतःचा इतिहास बरंच काही उघड करणारा आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले असतानाही बाबरी मशिदीचं संरक्षण करण्यात उत्तर प्रदेशच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांना अपयश आलं, पण त्यांच्यावर कोणतीही कारवाई न्यायालयाने केली नाही. बाबरी मशीद विध्वंस प्रकरणामधील आरोपींविरोधात फौजदारी खटला कूर्मगतीने सुरू आहे, त्यासंबंधी वेळोवेळी देण्यात आलेली मुदत कधीच पाळली गेली नाही, पण हे सगळं न्यायालयाने खपवून घेतलं.

बाबरी मशीद मालकी हक्क प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाला निवाडा अजिबातच संपूर्ण न्याय ठरत नाही. अनुच्छेद १४२ अंतर्गत देण्यात आलेले अधिकार वापरूनही या निकालाला संपूर्णत्व प्राप्त होत नाही. असलाच तर हा निकाल अपूर्ण न्यायाचा किंवा त्याहून वाईट म्हणजे 'संपूर्ण अन्याया'चा दाखला आहे. ●

## लोकशाहीवर पाळत

*नागरी व मानवी अधिकारांना पाळतयंत्रणेकडून थेट धोका असणं, हा जागतिक चिंतेचा विषय आहे.*

आपल्या लोकशाहीवर पाळत ठेवली जाते आहे. राज्यघटनेच्या परिमाणांनुसार अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य व्यक्ती वापरत असतील, तर त्यातून राष्ट्रीय सुरक्षेला धोका उत्पन्न होत नाही. 'पीगेसस' या स्पायवेअर सॉफ्टवेअरद्वारे काही भारतीयांवर पाळत ठेवण्यात आल्याचं अलीकडेच उघडकीस आलं. मुख्यत्वे व्हॉट्स-ॲपच्या माध्यमातून माहितीचा गैरवापर करणारं हे स्पायवेअर आहे. एकदा इन्स्टॉल झाल्यावर हे स्पायवेअर मोबाइलमधील कशाचाही गैरवापर करू शकतं. यामध्ये कॉलचा तपशील, संदेश, परवलीचे शब्द व संपर्क याद्या या सगळ्याचा समावेश होतो. इतकंच नव्हे, तर फोनचा कॅमेरा व मायक्रोफोन सुरू करून फोनजवळच्या हालचाली टिपण्याचीही क्षमता या स्पायवेअरमध्ये आहे.

पीगेससची मालकी इस्राएलच्या 'एनएसओ ग्रुप टेक्नॉलॉजीज्'कडे आहे. लोकांविरोधात गुप्तहेरगिरी करायला, त्यांना धमकवायला व त्यांचा माग काढायला सौदी अरेबियाचं सरकार या कंपनीच्या सेवा वापरतं. इस्ताम्बूलमधील सौदी अरेबियाच्या दूतावासामध्ये २०१८ साली हत्या झालेले वॉशिंग्टन पोस्टचे स्तंभकार व सरकारशी मतभिन्नता दर्शविणारे जमाल खशोग्गी यांच्यावर पाळत ठेवण्यासाठीही सौदी अरेबियाच्या शासनाने या सेवेचा वापर केला होता. पीगेसस स्पायवेअरच्या वापरासंबंधी भारत सरकारने संसदेत उडवाउडवीची उत्तरं दिली. केवळ राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावरून सरकार स्वतःचा बचाव करू पाहत होतं. विद्यमान कायद्यांनुसार, सार्वजनिक सुरक्षिततेला किंवा राष्ट्रीय सुरक्षेला बाधा पोचेल अशा दुर्मीळ आणीबाणीच्या वेळी विशिष्ट संदेशन अवरोधित (इंटरसेप्ट) करण्याचा अधिकार सरकारला आहे. परंतु, 'के. एस. पुट्टस्वामी विरुद्ध भारतीय संघराज्य' या खटल्यात २०१८ साली सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्यानुसार, राष्ट्रीय सुरक्षेचं कारण सरसकटपणे दिलं जाऊ नये.

या टोकाच्या आगंतुक पाळतप्रक्रियेला बळी पडलेल्या १२१ व्यक्तींपैकी अनेक जण कार्यकर्ते, अकादमिक अभ्यासक व पत्रकार आहेत. सरकारशी मतभेद असलेल्या या व्यक्तींचं ज्ञान व मतं राष्ट्रीय सुरक्षेला बाधा पोचवणारी असल्याचा बभ्रा करण्यात आला. राज्यसंस्थेचं उत्तरदायित्व आणि मानवाधिकारांचं उल्लंघन, यासंबंधी या लोकांनी उपस्थित केलेले प्रश्न

सरकारप्रमाणे प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही धोकादायक वाटणं शक्य आहे. या पार्श्वभूमीवर मतनिर्मात्या घटकांवर पाळत ठेवण्यासारखं अवाजवी पाऊल उचलण्यामागचा सरकारचा हेतू काय आहे, हा प्रश्न विचारणं अनिवार्य ठरतं.

'२६/११'च्या मुंबई हल्ल्यावेळी गुप्तचर खात्याचा अपुरेपणा दिसून आला, त्यानंतर भारताने विस्तृत डेटाबेस तयार करायचा प्रयत्न सुरू केला आहे. मोठ्या संख्येने लोकांवर पाळत ठेवण्यासाठी व त्यांच्यावरील देखरेखीची केंद्रं उभारण्यासाठी बराच पैसाही सरकार खर्च करतं आहे. 'नॅशनल इन्टेलिजन्स ग्रिड' (नॅटग्रिड), 'सेन्ट्रल मॉनिटरिंग सिस्टम' (सीएमएस) व 'नॅशनल ऑटोमोटेड फेशिअल रेकग्निशन सिस्टम ऑफ क्राइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टम्स' (सीसीटीएनएस) यांसारखे प्रकल्प पोलिसी शासन उभारण्यासाठी मदत करत आहेत. माहितीचा गैरवापर थांबवण्यासाठी कोणतंही संरक्षण किंवा अशा पाळतीला आव्हान देणारी कोणतीही तक्रारनिवारण यंत्रणाया चौकटीत उपलब्ध नाही. या व्यवस्था टप्प्याटप्प्याने विस्तारल्या जात आहेत, म्हणजेच कोणत्याही वेळी कोणावरही पाळत ठेवण्याची ताकद राज्यसंस्था संथ गतीने मिळवते आहे. आता हे डेटाबेस प्रत्यक्षात आलेले असताना आपण हे लक्षात घ्यायला हवं की, भारतामध्ये पाळतयंत्रणेवर नियमन ठेवण्याची प्रक्रिया दशकभर उशिराने सुरू झाली आहे. कायद्याच्या मंजुरीशिवाय माहिती मिळवणं आणि त्यासाठी कार्यकारी आदेशाचा वापर करणं, हासुद्धा चिंतेचा मुद्दा आहे. उदाहरणार्थ, कार्यकारीसंस्थेने कायद्याच्या संमतीशिवायच 'आधार' प्रकल्प पुढे रेटला. पुरेशी कायदेशीर रूपरेखा किंवा डेटा संरक्षणाची रूपरेखा अस्तित्वात नसतानाच 'आधार' अनिवार्य ठरवण्यापर्यंत सरकारची मजल गेली. या प्रकल्पाच्या सुरक्षिततेविषयी अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले असून याचा फटका बसलेल्यांना तक्रार निवारणासंबंधी कोणतीही सोय नाही.

नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचं रक्षण करण्याचं दायित्व राज्यसंस्थेवर आहे, आणि खाजगीपणाचा अधिकार हा त्यांपैकीच एक आहे. 'एनएसओ ग्रुप टेक्नॉलॉजीज'सारख्या कंपन्यांना या अधिकाराचं उल्लंघन करायची मुभा देणं गंभीर नियमभंग करणारं ठरतं. योग्य प्रक्रिया पार न पाडता, अशा निष्काळजी पद्धतीने सुरक्षासंस्थांनी व्यक्तींकडून खाजगीपणाचा अधिकार हिरावून घेता कामा नये आणि अपवादात्मक परिस्थिती वगळता या अधिकाराचा भंग व्हायला नको. या संदर्भातल मुंबई उच्च न्यायालयाच्या अलीकडच्या एका निवाड्यात पुढील दिशा दाखवण्याचा प्रयत्न आहे. एका भ्रष्टाचाराच्या खटल्यात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सेन्ट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन: सीबीआय) बेकायदेशीर पाळत ठेवून मिळवलेल्या पुराव्याच्या वापरावर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उमटवलं. हा पुरावा न्यायालयाने स्वीकारला नाहीच, शिवाय ही सर्व माहिती पुसून टाकावी अशी मागणी सीबीआयकडे केली. सार्वजनिक सुरक्षिततेला धोका असलेल्या आणीबाणीतच करायची कृती सीबीआयने या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात केली, हे न्यायालयाला रुचलं नाही.

राजकीय लाभासाठीसुद्धा पाळतीचा वापर केला जातो. पाळत ठेवण्यासंबंधी सेवा पुरवणाऱ्या 'हॅकिंग टीम' या इटालियन कंपनीने २०१५ साली काही ई-मेल फोडल्या, त्यानुसार दूरध्वनी अवरोधाची साधनं विकत घेण्यात आंध्र प्रदेश पोलिसांना रस असल्याचं उघड झालं. तेलंगणचे तत्कालीन मुख्यमंत्री आपला दूरध्वनी टॅप करत असल्याची तक्रार आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी तत्कालीन केंद्रीय गृह मंत्री राजनाथ सिंग यांच्याकडे केली होती, त्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश पोलिसांच्या संदर्भातील ही माहिती बाहेर आली. दुसऱ्या एका ई-मेलद्वारे झालेल्या खुलाशानुसार, छत्तीसगढ राज्य पोलिसांचे काही सदस्य सातत्याने 'एनएसओ ग्रुप टेक्नॉलॉजीज' च्या प्रतिनिधींना भेटत

होते. एकीकडे व्हॉट्स-ॲपने खाजगीपणाचा भंग केल्याबद्दल त्यांच्याकडून सरकार अधिक माहिती मागत आहे, तर दुसरीकडे या कंपन्यांचं काय चाललंय याबद्दल मात्र सरकार काहीच विचारणा करताना दिसत नाही.

माहिती अधिकार कायद्यासह कोणत्याही कायद्यात सूट न मिळालेल्या राष्ट्रीय सुरक्षा संस्था आपल्या लोकशाहीसाठी दायित्व बनल्या आहेत, कारण असुक्षित घटकांचं संरक्षण करण्याऐवजी सत्ताधाऱ्यांचं संरक्षण करणं हा त्यांचा मूळ उद्देश असल्याचं दिसतं. भारतामध्ये पाळतविषयक सुधारणांची तातडीची गरज आहे. 'वैयक्तिक डेटा संरक्षण विधेयक, २०१९'ची चर्चा संसदेत होऊ घातली आहे, त्याची काळजीपूर्वक तपासणी करून त्यासंबंधीचं वार्तांकन व्हायला हवं. लोकप्रतिनिधींनी पारदर्शकतेची मागणी करायलाच हवी आणि विद्यमान पाळत प्रक्रियांची तपासणी करून घटनाबाह्य प्रकार करणाऱ्यांना उत्तरदायी ठरवलायला हवं. पीगेसस प्रकरणातील तपास माहिती-तंत्रज्ञानविषयक संसदीय समितीने वेगाने पूर्ण करायला हवा आणि लवकरात लवकर सर्वांगीण व भविष्यवेधी अहवाल सादर करायला हवा. अशा घटनांवेळीच आपल्या लोकशाहीची चाचणी होत असते, त्यामुळे भारतीय संस्थांनी मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी पुढे पावलं टाकायला हवीत.

●

---

## उपासमार व कुपोषण यांचं अरिष्ट

*अन्नसुरक्षा व पोषण यांची खात्री देणाऱ्या धोरणांवर नव्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे आणि त्यांची अंमलबजावणी तातडीने व्हायला हवी.*

स्वातंत्र्य मिळून कित्येक दशकं लोटली तरी, भारतीय जनतेचं- विशेषतः लहान मुलं, महिला व असुरक्षित घटकांचं जीवन धोक्यात टाकणारी उपासमार व कुपोषणाची समस्या दूर करण्यात आपल्याला यश आलेलं नाही, ही लांच्छनास्पद बाब आहे. उपासमारीची समस्या कमी करण्यासंदर्भात विविध देशांची कामगिरी जोखण्यासाठी या वर्षी प्रकाशित झालेल्या जागतिक भूक निर्देशांकाने अल्पपोषण, मुलांचं खंगणं (वेस्टिंग), मुलांची खुंटलेली वाढ (स्टंटिंग) व बालमृत्यू हे चार निर्देशांक वापरले. या निर्देशांकानुसार, 'गंभीर' पातळीवरील उपासमार अनुभवणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश होतो.

संयुक्त राष्ट्रांनी निश्चित केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार २०३० सालापर्यंत जगातील उपासमार शून्यावर आणायची आहे. हे उद्दिष्ट साध्य करायचं असेल, तर सरकारने अभिनव आणि टिकाऊ व्यूहरचना आखायला हव्यात, त्याचप्रमाणे इच्छित परिणाम साधण्यासाठी ठाम निर्धारही करायला हवा. हे उद्दिष्टा गाठण्याकरिता जागतिक भूक निर्देशांक सर्व देशांमधील उपासमारीचं प्रमाण मोजतो. भारतामध्ये 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३' लागू असला आणि वर्षानुवर्षं अन्नधान्याचा साठा तयार होत असला, तरी माणसांना कमकुवत करणारी उपासमारही टिकून राहिलेली आहे, असं या अहवालातून समोर येतं. या परिस्थितीमुळे पुरेसं अन्न मिळण्याच्या प्राथमिक अधिकारावर गदा आली आहे. भारताच्या शेजारच्या काही दक्षिण आशियाई देशांनी उपासमारीसंदर्भात अधिक चांगली कामगिरी केलेली आहे.

भारतातील प्रचंड लोकसंख्येमुळे इथल्या भूक निर्देशांकाचा मोठा परिणाम या संपूर्ण प्रदेशातील निर्देशांकावर होतो. या अहवालानुसार, भारतामध्ये सहा ते २३ महिने वयोगटातील केवळ ९.६ टक्के मुलांना किमान स्वीकारणीय आहार मिळतो. शिवाय, भारतातील मुलांच्या खंगण्याचा दर, किंवा उंचीच्या

तुलनेत वजन कमी भरणाऱ्या पाच वर्षांखालील मुलांचं प्रमाण २०.८ टक्के आहे. तीव्र अल्पपोषणाचा हा एक निर्देशांक मानला जातो आणि या अहवालातील आकडेवारीनुसार भारतामध्ये अशा खंगण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे. मुलांची वाढ खुंटण्याचा दर, किंवा वयाच्या तुलनेत कमी उंची भरणाऱ्या पाच वर्षांखालील मुलांचं प्रमाण, भारतात तब्बल ३७.९ टक्के आहे. सततच्या अल्पपोषणाचा हा एक निर्देशांक मानला जातो. परंतु, जागतिक भूक निर्देशांकातील गुण व निर्देशांक मूल्यं यांच्या आधारे दोन वर्षांमधील क्रमवारीची तुलना करता येत नाही, त्यामुळे या निर्देशांकावर टीकाही करण्यात आली आहे. शिवाय, आकडेवारी व त्यासाठी वापरलेल्या पद्धतीमध्ये होणाऱ्या बदलांनुसार दर वर्षी या अहवालात वेगवेगळे देश समाविष्ट केले जातात.

परंतु, भारतातील मुलांच्या जीवनाला कुपोषणाचा मोठा धोका आहे, ही वस्तुस्थिती काही नाकारता येणार नाही. युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंडने (युनिसेफ) प्रसिद्ध केलेल्या 'स्टेट ऑफ वर्ल्ड्स चिल्ड्रेन' या दुसऱ्या एका अहवालाने या वस्तुस्थितीवर शिक्कामोर्तब केलं आहे. मुलांच्या आरोग्याची स्थिती- विशेषतः कुपोषण, रक्तक्षय व लठ्ठपणा इत्यादी आरोग्यविषयक समस्यांची स्थिती तपासण्याचा प्रयत्न या अहवालात केला आहे. पुरेसा पोषक आहार न मिळणं हे जगभरातील अनेक मृत्यूंचं कारण ठरल्याचा निष्कर्ष या अहवालाने काढला. भारतामध्ये पाच वर्षांखालील बालकांचा मध्यम मृत्यूदर प्रति १००० मृत्यूंमागे ३७ इतका आहे, पण २०१८ साली देशात अशा प्रकारचे सर्वाधिक मृत्यू (८,८२,०००) घडले, त्यांपैकी ६२ टक्के मृत्यू नवजात अर्भकांचे होते. तर, पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्यूंपैकी ६९ टक्के मृत्यू कुपोषणामुळे झाले होते. दर सेकंदाला या वयोगटातील एका बालकाला कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या कुपोषणाची लागण होते. उपरोल्लेखित अहवालानुसार, भारतातील ३५ टक्के मुलांची वाढ खुंटलेली आहे, १७ टक्के मुलं खंगलेली आहेत आणि ३३ टक्के मुलं कमी वजनाची आहेत. सहा ते २३ महिने वयोगटातील केवळ ४२ टक्के मुलांना पुरेशा वारंवारतेने आहार मिळतो, तर केवळ २१ टक्क मुलांना पुरेसं वैविध्य असलेला आहार मिळतो. दर सेकंदाला एक महिला रक्तक्षयी असल्याचं आढळतं, तर ४०.५ टक्के मुलांना रक्तक्षयाची लागण झालेली असते. आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या 'सर्वांगीण राष्ट्रीय पोषण सर्वेक्षणा'नुसार (२०१६-१८) भारतामध्ये पाच वर्षांखालील ३४.७ टक्के मुलांची वाढ खुंटलेली आहे, १७.३ टक्के मुलं खंगलेली आहेत, आणि ३३.४ टक्के मुलांचं वजन कमी आहे.

पोषण पुरेसं न होण्याला अनेक घटक कारणीभूत आहेत. यातून राज्या-राज्यांमधील विषमताही समोर येते. गरीबी, अन्नधान्य व कडधान्यांची पुरेशी उपलब्धता नसणं, आहारात मौलिक पोषक घटकांचा अभाव, अपरिणामकारक सार्वजनिक शिधावाटप व्यवस्था व विषम वाटप, घरामधील स्त्रियांचं दुय्यम स्थान, स्वच्छ पाण्याची उपलब्धता नसणं आणि अस्वस्थता, याचप्रमाणे जनुकीय व पर्यावरणीय घटकही याला कारणीभूत असतात. वर्षानुवर्षं सत्तेत आलेल्या सरकारांनी या समस्येवर काम करण्याची राजकीय इच्छाशक्ती दाखवलेली नाही आणि विद्यमान व्यवस्था व धोरणं या समस्येवर परिणामकारक तोडगा काढण्यात अपयशी ठरली आहेत. परंतु, आत्ताचा पेच वरील दोन्ही घटकांच्या संयोगातून निर्माण झालेला आहे.

सध्या 'प्रधानमंत्री मातृवंदना योजने'नुसार गरोदर व स्तनपान देणाऱ्या मातांकडे रोख रक्कम सशर्त हस्तांतरित केली जाते. त्याचप्रमाणे २०२२ सालापर्यंत भारत कुपोषणमुक्त करण्याचं उद्दिष्ट ठेवून राष्ट्रीय पोषण अभियान सुरू करण्यात आलं आहे. वाढ खुंटणं व अल्पपोषण यांमध्ये मोठी घट व्हावी, अशी तजवीज या योजनेखाली होणं अभिप्रेत आहे. परंतु, अल्पपोषणाच्या पातळीतील घट इतकी मंद गतीने होते आहे की, सदर उद्दिष्ट गाठलं जाणं संभाव्य वाटत नाही, असं अलीकडेच

एका संशोधननिबंधातून समोर आलं. 'क्रेडिट सुइस ग्लोबल वेल्थ रिपोर्ट'नुसार भारत हा जगातील सर्वांत वेगाने संपत्ती निर्माण करणाऱ्या देशांपैकी एक आहे, पण तरीही इथली उपासमार व तीव्र कुपोषण समूळ नष्ट करण्यात आपल्याला यश आलेलं नाही, हा दुःखद विरोधाभास आहे. त्यामुळे, लोकांना पुरेसं अन्न व पोषण मिळेल, याला सरकारांनी सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवं. मानवी विकास साधण्यासाठी पोषण आहारामध्ये पुरेशी गुंतवणूक करायला हवी.

●

---

## 'आरसीईपी'शिवायची अर्थव्यवस्था

*'आरसीईपी' करारामधून भारत बाहेर पडला असला, तरी त्यातून देशाच्या आजारी अर्थव्यवस्थेवर फारसा उपाय होणार नाही.*

'रिजनल कॉम्प्रीहेन्सिव्ह इकनॉमिक पार्टनरशिप' (आरसीईपी) करारामधून माघार घ्यायच्या भारत सरकारच्या निर्णयाकडे आपण कसं पाहावं? अशा प्रकारच्या मुक्त व्यापार करारांचे आपल्या उपजीविकेवर विपरित परिणाम होतील, अशी चिंता व्यक्त केलेल्या सर्वसामान्य भारतीयांनी दिलेल्या निवडणुकीय निकालाशी हा निर्णय संबंधित आहे का? की, देशाच्या प्रादेशिक (आर्थिक) वर्चस्वाला लाभदायक ठरण्याची संभाव्यता असलेल्या बहुराष्ट्रीय वाटाघाटींमध्ये उतरण्याचा मोह टाळून सरकारने स्वतःची स्वायत्त राजकीय इच्छाशक्ती दाखवली आहे? की, जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्वोच्च घटकांच्या राजनैतिक हितसंबंधांनी भारतावर हा निर्णय थोपवला? काहीही असलं तरी, दोन पंचमांश जागतिक व्यापाराचं शासन करण्यासाठी तयार झालेल्या व्यापारी गटातून बाहेर पडण्याचं धाडस सत्ताधारी सरकारनं दाखवलं याबद्दल त्यांना दाद द्यायलाच हवी. परंतु, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून पाहिल्यावर मात्र दुर्दैवाने हा पराक्रम पोकळ ठरतो. सरकारचा हा निर्णय आर्थिक दृढीकरणाच्या एकसंध 'धोरणा'तून झालेला नाही, तर राजकीय अपरिहार्यतेमुळे झालेली ही सुटी 'कृती' आहे, असं दिसतं.

आशिया-पॅसिफिक प्रदेशातील इतर अनेक प्रादेशिक व्यापार करारांप्रमाणे आरसीईपीसुद्धा आग्नेय आशियाई राष्ट्रांच्या संघटनेला (असोसिएशन ऑफ साउथ-ईस्ट एशियन नेशन्स) केंद्रस्थानी ठेवणारा आहे. गेल्या दशकभरात आसिआनने या प्रदेशातील अनेक व्यापारविषयक चर्चांना/व्यूहरचनांना चालना दिली आहे, पण मूल्यवपाती विक्रीसारख्या (डम्पिंग) प्रादेशिक व्यापारातील प्रश्नांवर ठोस तोडगा काढण्यात मात्र या संघटनेला अपयश आलेलं आहे. उदाहरणार्थ, चीनने आसिआनचा- विशेषतः सिंगापूरचा (ज्याच्याशी भारताने मुक्त व्यापार करार व दुहेरी करवर्जन करार केले आहेत)- वापर करून हलक्या मूल्याच्या उत्पादनांची मूल्यवपाती विक्री भारतात सुरू केली, हे लक्षात येऊनही त्याला पायबंद घातला गेलेला नाही. भारताने केलेल्या बहुतांश मुक्त व्यापार करारांमध्ये 'उत्पादनाचा उगम' असं काही कलम नाही, त्यामुळे मूल्यवपाती विक्रीचा स्रोत सिद्ध करणं अवघड जातं. आरसीईपीमध्ये अशा प्रकारचं कलम असावं, असा भारताचा आग्रह होता. त्यामुळे या भागीदारीमध्ये भारताने सहभागी होणं प्रदेशातील एकंदर व्यापारी रचनांसाठी अनुकूल ठरण्याची शक्यता होती. मग आरसीईपीची संधी भारताने गमावली, असं म्हणावं का? आरसीईपीतून माघार घेतल्याने प्रदेशांतर्गत व्यापारी भागीदार म्हणून भारताच्या विश्वासार्हतेवर परिणाम होईल का? आर्थिक कल्याणासाठी प्रदेशांतर्गत व्यापार इतका महत्त्वाचा असेल, तर भारत सरकारने भागीदारीतून बाहेर पडण्याऐवजी अनुकूल शर्थींसाठी वाटाघाटी

चिकाटीने सुरू का ठेवल्या नाहीत?

आसिआन व त्यामुळे आसिआनप्रणित आरसीईपी हे भारताचे स्वाभाविक व्यापारी भागीदार ठरत नाहीत, आणि चीनसारख्या प्रदेशाशई जवळचे संबंध भारत प्रस्थापित करू शकत नाही, असा युक्तिवाद केला जाऊ शकतो. पण एकंदर प्रदेशापेक्षा आसिआनमधील (आणि आरसीईपीमधीलही) अनेक देशांशी भारताचा सुटा द्विराष्ट्रीय व्यापार अधिक ठोस स्वरूपाचा आहे, या वस्तुस्थितीला नजरेआड करून चालणार नाही. आसिआनला मुक्त व्यापारी प्रदेश म्हणून सैद्धान्तिक महत्त्व आहे, पण जागतिक व्यापारातील या प्रदेशाचा वाटा केवळ सात टक्के आहे, आणि आसिआनच्या एकूण व्यापारातील भारताचा वाटा सुमारे दोन-तीन टक्केच आहे. ही संघटना पाच दशकांपूर्वी अस्तित्वात आली, तरीही परिस्थिती अशी आहे. इतका कमी वाटा असतानाही भारत कित्येक वर्षं आसिआनचा चर्चा भागीदार होता, पण आता आरसीईपीसोबतच हे स्थानही भारत सोडण्याची शक्यता आहे. दुसऱ्या बाजूला, भारताच्या माघारीमुळे आरसीईपीचा व्यापार एक तृतीयांशाने कमी येईल असा अंदाज आहे, पण आरसीईपीचे सदस्य असलेल्या अनेक देशांशी असलेला भारताचा द्विराष्ट्रीय व्यापार विनाअडथळा सुरूच राहील. बहुराष्ट्रीय आर्थिक करारांमुळे होणाऱ्या विनिमय खर्चाऐवजी अशा द्विराष्ट्रीय रचना लाभदायक ठरत असल्याचं दिसतं.

खरं म्हणजे अखेरच्या क्षणी या करारामधून बाहेर पडणं हा भारत सरकारचा राजकीय मास्टर स्ट्रोक आहे. दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य परिषदेसारख्या (साउथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कोऑपरेशन- सार्क) संघटनेधील सदस्य देशांचे संबंध ताणलेले असतानाही ही संघटना तीन दशकं जिवंत आहे, यालाही आर्थिक सक्रियतेपेक्षा राजकीय अपरिहार्यता कारणीभूत ठरली. प्रादेशिक संघटनांमध्ये सहभागी होताना त्या-त्या देशाची राजकीय वैधतेची गरज प्रबळ ठरताना दिसते. रचनात्मकदृष्ट्या दुर्बल असलेल्या अशा संघटनांमध्ये सहभागी होऊन काही देशांना उदारीकरणाच्या आरंभकाळात वैधता मिळाली असली, तरी त्यातून माघार घेऊन आज काही फारसे लाभ होतील असं नाही, कारण जगातील मोठ्या अर्थव्यवस्थाही बचावात्मक पवित्रा घेत आहेत.

भारताने शेवटच्या क्षणी या करारातून माघार घेतल्यामुळे जागतिक पातळीवर आशिया-पॅसिफिक साथीदारांना सोयीस्कर मुत्सद्देगिरी भारत सरकारने केल्याची प्रतिमा निर्माण झाली, आणि देशांतर्गत पातळीवर सरकारची 'सर्वसामान्य माणसांना अनुकूल' ही कोलमडणारी प्रतिमा सावरायला मदत झाली. परंतु, अर्थव्यवस्थेतील काही घटकांना यातून मिळणारा दिलासा तात्पुरता असणार आहे, कारण अर्थव्यवस्थेतील रचनात्मक त्रुटी दूर करण्याचा विचार यात झालेला नाही. उदाहरणार्थ, ताज्या दुधाच्या विक्रेताकेंद्री स्थानिक बाजारपेठांमधून बाहेर पडण्याची शक्यताच नसलेल्या असंख्य लहान व परिघीय दुधोत्पादकांना आरसीईपीमधील सहभाग किंवा माघार याने काय फरक जाणवेल? देशांतर्गत बाजारपेठेतील बड्या घटकांची मक्तेदारी सुरक्षित राहात असली, तरी भारतीय दुग्धोत्पादनांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरवण्याच्या संदर्भात हा निर्णय हितकारक नाही. हे सरकार शेतकी उत्पादनांमध्ये वैविध्य आणून 'शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट' करण्याचा दावा करतं (त्यासंबंधीची कालमर्यादा मात्र सोयीने बदलत राहाते), मग उत्पादकांना पर्यायी बाजारपेठांपर्यंत पोचता यावं आणि/किंवा त्यातून निवड करता यावी अशा 'सक्षमकारी' धोरणांचा विचार सरकारने करायला नको का? त्याऐवजी 'सावध बहुराष्ट्रीयवादा'च्या नावाखाली बाजारपेठांचे पर्याय मर्यादित करून काय साधेल?

आंतराराष्ट्रीय व्यापार हा अर्थव्यवस्थेइतकाच राजकारणाचाही विषय असतो. त्यामुळे अशा व्यापारी करारांची अंमलबजावणी करताना सरकारने पुरेशी

सावधानता बाळगायला हवी. सरकार उत्तरदायित्वाच्या भावनेने सावध राहू शकतं, त्याचप्रमाणे स्वतःच्या जबाबदाऱ्या टाळण्यासाठी सरकार सावधानतेचा 'बहाणा'सुद्धा करू शकतं. आरसीईपी संदर्भात आपल्या सत्ताधारी सरकारने घेतलेल्या भूमिकेची प्रशंसा करताना हा सूक्ष्म भेद आपण लक्षात ठेवायला हवा. ●

## विद्यार्थ्यांचे मृत्यू ही राष्ट्राची हानी

*परिघावरील व अल्पसंख्याक समुदायातील तरुण विद्यार्थींनी केलेल्या आत्महत्या आपल्या राष्ट्रीय अपयशाकडे लक्ष वेधतात.*

मृत विद्यार्थ्यांचा- स्वतःचं जीवन संपवणं भाग पडलेल्या विद्यार्थ्यांचा आकडा वाढतानाच दिसतो आहे. तपशिलांच्या संदर्भात त्या-त्या प्रकरणामध्ये भिन्नता असेल, पण दोन कळीचे घटक या सर्व मृत्यूंच्या बाबतीत सामायिक असल्याचं दिसतं. एक, उच्चशिक्षण संस्थांमध्ये दाखल झालेले यातील बहुतांश विद्यार्थी परिघावरील जातींमधून व धार्मिक अल्पसंख्याक समुदायांमधून आले होते. दोन, संबंधित संस्था प्रशासनाने त्यांच्या तक्रारींकडे आणि व्यथांकडे दुर्लक्ष केलं होतं. यातील काहींची नावं आत्महत्यानंतर अनेकांना परिचित झाली: अनिल मीना, रोहित वेमुला, सेन्थील कुमार, पायल ताडवी, नजीब अहमद आणि अलीकडेच- ९ नोव्हेंबर रोजी आत्महत्या केलेली फातिमा लतीफ ही काही उदाहरणादाखल नावं. परंतु, ही यादी हजारांमध्ये जाते. सरकारी निवेदनांनुसार, २०१४ ते २०१६ या वर्षांमध्ये देशभरात एकूण २६,५०० विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. प्रत्येकाच्या मागे व्यथित कुटुंबीय व मित्रसमुदाय आहे. परीक्षेच्या निकालात अधिकाधिक टक्केवारी कमावण्याच्या अमानवी स्पर्धेचा ताण यातील अनेकांनी सहन केला असणार. मदतीसाठी हाक देणाऱ्यांना प्रतिसाद देणारी यंत्रणा आपण अजून उभी करू शकलेलो नाही, हे राष्ट्र म्हणून आपल्याला लाजीरवाणं आहे.

अशा अनाठायी कारणांसाठी होणाऱ्या जीवितहानीला प्रतिबंध करण्याकरिता अनेक संस्थांनी अर्थपूर्ण भूमिका निभावणं गरजेचं असतं, परंतु या संस्थांना त्यात अपयश येतं. माध्यमं ही अशीच एक संस्था आहे. उदाहरणार्थ, तामीळनाडूत जानेवारी २०१६मध्ये होमिओपथीच्या अभ्यासक्रमातील तीन दलित विद्यार्थिंनी आत्महत्या केल्या. या तिघींनीही महाविद्यालयाच्या अध्यक्षांसह राज्य प्रशासनाकडेही वारंवार तक्रार केली होती की, अवाजवी शुल्क उकळण्यासाठी त्यांचा 'छळ' केला जातो आहे आणि अभ्यासाची व निवाऱ्याची सुविधा दुर्दशेत आहे. शेवटी, आपला व आपल्या विद्यार्थ्यांचा आवाज जगापुढे येण्यासाठी आपलं जीवन संपवणं हा एकच मार्ग असल्याची भावना या गरीब कुटुंबातील विद्यार्थिनींच्या मनात निर्माण झाली.

भावोत्कट व निराशाजनक आत्महत्येची पत्र माध्यमं प्रकाशित करतात, पण मृत्यूच्या बाबतीतही या विद्यार्थ्यांचा विश्वासघात होतो. काही दिवस किंवा आठवडे ही पत्रं समाजमाध्यमांवरून शेअर केली जातात, त्यावर प्रतिक्रियाही दिल्या जातात. मग मात्र पुन्हा जैसे थे परिस्थिती सुरू राहाते. काही सन्माननीय अपवाद वगळता कोणीही पोलीस तपासाचा पाठपुरावा करत नाही किंवा स्वतःहून या आत्महत्यांबाबत चौकशीही करत नाही, वा दोषींविरोधात कारवाईसाठी प्रशासनावर दबाव आणत नाही. बहुतेक प्रकरणांमध्ये सुरुवातीच्या सनसनाटी बातम्या वगळता नंतर प्रकरण कुठवर आलं याची कसलीही माहिती माध्यमांमधून पुढे येत नाही.

परंतु, माध्यमांपेक्षाही संबंधित उच्चशिक्षण संस्थांचं प्रशासन याबाबतीत अधिक उत्तरदायी असायला हवं.

यातील अनेकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रमवारीतील स्वतःच्या संस्थेच्या स्थानाचा अभिमान असतो, पण आपल्याच संस्थेतील विद्यार्थ्यांच्या दुर्देशेकडे मात्र ते सरळ दुर्लक्ष करतात. बहुतांश दलित व आदिवासी विद्यार्थी किंवा इतर अल्पसंख्याक समुदायांतील विद्यार्थी मोठी सामाजिक व आर्थिक किंमत मोजून या संस्थांमध्ये आलेले असतात, अपरिचित वातावरणात रुजण्यासाठी त्यांना बराच संघर्ष करावा लागतो. सर्वसाधारणतः ही मुलं बिगरइंग्रजी माध्यमांमध्ये शिकलेली असतात, त्यामुळे या उच्चशिक्षण संस्थांमधील माध्यमाशी व सहाध्यांच्या संवादपद्धतीशी जुळवून घेणं त्यांना अवघड जातं. रचनात्मक पातळीवर काही सहाय्यकारी चना अस्तित्त्वा असल्या तरी त्या कितपत परिणामकारक आहेत, कितपत संवेदनशील आहेत? आघाडीच्या वैद्यकीय व इतर संस्थांमध्ये अनुसूचित जातीय, अनुसूचित जमातीय व इतर परिघीय समुदायांमधील विद्यार्थ्यांना भेदभावाची वागणूक दिली जाते, असे अहवाल तयार केले जातात. या अहवालांचं पुढे काय होतं, आणि त्यातील सूचनांच्या अंमलबजावणीची खातजमा केली जाते का, हे एक गूढच आहे. बाह्य व अंतर्गत मूल्यांकन व मूल्यमापनाचे उपाय, शिक्षकवर्गाची या विद्यार्थ्यांबाबतची प्रवृत्ती व वर्तन, वर्गप्रतिनिधींची निवड, इत्यादींसंबंधीच्या शिफारसी या अहवालांमधून केलेल्या असतात. वसतिगृहांमध्ये, कॅन्टिनमध्ये/खानावळींमध्ये, आणि वर्गांमध्ये सहन कराव्या लागणाऱ्या एकंदर भेदभावामुळे या विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असते, हे पुन्हा नमूद करायला नकोच. परंतु, याकडे फारसं लक्ष दिलं जात नाही.

'आयआयटी - मद्रास' इथल्या मानव्यविद्या विभागात शिकणाऱ्या फातीमा लतीफ हिच्या आत्महत्येसंदर्भात पालकांनी असा आरोप केला आहे की, शिक्षकांपैकी काही जण त्यांच्या मुलीचा छळ करत होते आणि त्यामुळेच तिला इतकं टोकाचं पाऊल उचलणं भाग पडलं. या संस्थेमध्ये गेल्या वर्षभरात पाच विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

गरजूंसाठी संस्थेत समुपदेशनाची यंत्रणा आहे व कल्याण केंद्र आहे, शिक्षक मदतनीस व इतर उपायही अंमलात आणलेले आहेत, असं संस्थेच्या प्रशासनाने म्हटलं आहे. उच्चशिक्षण संस्थांनी समुपदेशन व विद्यार्थीकल्याण केंद्रं स्थापन करावीत, अशा सूचना केंद्र सरकार करणार असल्याच्या बातम्याही आल्या होत्या. परंतु, या सरधोपट उपायांपलीकडे जाण्याची तातडीची गरज आहे. आरक्षणव्यवस्था योग्य पद्धतीने पार पडते आहे ना, किंवा समुपदेशकांची भरती केली आहे ना, याची खातरजमा करणं पुरेसं नाही. प्रगत शिक्षण, विवेकी व विज्ञानवादी विचार आणि विद्वत्ता यांना चालना देण्यासाठी स्थापन झालेल्या संस्था विशिष्ट पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांबाबत वारंवार चुकीचं का वागतात, हे शोधण्यावर लक्ष केंद्रित करणं गरजेचं आहे. त्या-त्या समुदायातील इतरांकरिता आदर्श ठरू शकतील असे हे तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनी इतक्या अडीअडचणींचा सामना करून, अडथळे पार करून या संस्थांमध्ये येतात, पण अखेरीस हे सर्व जगणंच सोडून जावंसं त्यांना का वाटतं?

अशा संवेदनशील प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी सार्वजनिक चर्चेमध्ये कायम 'गुणवत्ता' व 'राखीव जागा' यांसारखे विषय मध्यवर्ती राहातात. परिघीय समाजघटक व अल्पसंख्या समुदाय यांचं प्रतिनिधित्व करणारे राजकीय पक्षही अशा काही चर्चा सुरू करताना दिसत नाहीत आणि तात्पुरत्या उपायांऐवजी दीर्घकालीन उपाय योजण्याची मागणीही ते करत नाहीत.

या तल्लख तरुण मनांचा व जीवांचा मृत्यू म्हणजे आपली राष्ट्रीय हानी आहे. अशा प्रकारची हानी रोखण्यासाठी तातडीचे उपाय गरजेचे आहेत, हे कधी समजून घेतलं जाईल?

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाऊंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (दि. ९ , १६ व २३ नोव्हेंबर या अंकांतून. 'महाराष्ट्राच्या राजकारणाची स्थितिगती' हे संपादकीय गोपाळ गुरू यांनी लिहिले आहे.)